GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director(I/c.)
Mo. No. - 8888282463

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com

पत्र क्र. No.GU/NSS/1150/2021 Dt : 02/01/2021

प्रति,

मा. प्राचार्य / रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— Yuvak Biradari Regional Mock Parliament **स्पर्धेत सहभागी होण्याबाबत.**

संदर्भ:— ०१) युवक बिरादरी यांचा दिनांक ३१ डिसेंबर २०२० चा ई—मेल.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, दिनांक ०४ जानेवारी २०२१ रोजी सकाळी १० ते ०६ वाजेपर्यंत Yuvak Biradari Regional Mock Parliament स्पर्धेचे आयोजन धनवटे महाविद्यालय, नागपुर येथे आयोजन केलेले आहे. सदर कार्यक्रमामध्ये संलग्नीत पत्रानुसार रासेयो स्वंयसेवकाना निर्देश देऊन सहभाग घेण्यास प्रोत्साहीत करावे.

धन्यवाद!

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

संलग्नपत्र:— युवक बिरादरी यांचा ई—मेल.

Gmail

Dr Anil Chitade <gug.registrar@gmail.com>

Yuvak Biradari Regional Mock Parliament Competition at Dhanwate

1 message

Yuvak Biradari <info@biradari.org> Thu, Dec 31, 2020 at 11:10 AM
To: vc@gondwanadigitaluniversity.ac, gug.registrar@gmail.com

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ..... दि. .....
जावक क्र. 16 दि. 01/01/2021

To,
VC,
Gondwana University/
DSO/
Director, NSS.
Namaste,
Greetings,
1. On 4th January,2021 between 10am to 6pm there will be a Regional Mock Parliament Competition at Dhanwate College, Nagpur.
2. Food arrangements, token appreciation of Rs.5,000/- will be given to each team.
3. There should be 20 participants in each team.
4. In this programme it will be good if Gadchiroli team also participate.
5. Competition literature for guidance is attached with this mail.
Regards,
Yuvak Biradari Team

4 attachments

- Abhirup Yuva Sansad Bill - **A.pdf** 65K
- Abhirup Yuva Sansad Bill - **B.pdf** 53K
- Abhirup Yuva Sansad Bill - **D.pdf** 54K
- Abhirup Yuva Sansad Bill - **C.pdf** 55K

Dr. Madavi
Director, NSS
31/12/2020

भाग १

संकल्पना व रचना

युवक बिरादरी (भारत) द्वारा विविध शैक्षणिक व युवा विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. कलाक्षेत्राप्रमाणेच सामाजिक बांधिलकी, बंधुता, अखंडता अशा विविध विषयांवर ही संस्था कार्यरत आहे. याचाच एक भाग म्हणजे अभिरूप युवा संसद. अभिरूप युवा संसद ही युवक बिरादरी (भारत) द्वारा सहयोगी संस्था युवकांमध्ये लोकशाही मूल्यांचे संस्कार रुजवण्यासाठी संसदीय पद्धतीच्या आचार, दूरगामी विचार, हजरजबाबीपणा, वक्तृत्व व वाद-संवाद या गुणांच्या वृद्धीबरोबर सकारात्मक दृष्टिकोन वाढावा म्हणून भारतीय घटनेच्या सरनाम्यातील उद्घोषांचा आदर राखून, सार्वभौम भारताच्या एकात्मतेसाठी जनसामान्यांच्या आकांक्षांना मूर्तरूप येईल, अशी चळवळ आहे. ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत काही लाखांपर्यंत कार्यरत असणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या परंपरेत, विचारांत प्रामाणिकपणा, आचारात स्वच्छता आदी गुणांच्या विकासासाठी उत्स्फूर्त नाट्यमय माध्यमातून संसदेची कार्यपद्धतीशी ते अवगत व्हावेत व त्यांना प्रत्यक्ष कार्याचा घटक बनता यावा, यासाठी अभिरूप युवा संसद ही स्पर्धा घेतली जाते.

युवक बिरादरीच्या सहयोगाने आयोजित केल्या जाणाऱ्या या अभिरूप युवा संसदेबाबत अपेक्षित योजना. अर्थात या योजनेत बदल करून सहभागी होणाऱ्या संस्थांना वेगळ्या पद्धतीने मांडणी करता येईल.

१) अभिरूप युवा संसदेसाठी २५ व्यक्तींचा संघ असावा. त्यात सत्तारूढ पक्षाचे ११ सदस्य आणि विरोधी पक्षाचे ९ सदस्य असतील. सभापती, सभापतीला साहाय्यक सेवक, संसदीय सचिव, मार्शल आणि चोपदार हे इतर पाच जण असतील.

२) अभिरूप युवा संसदेची रचना अर्धवर्तुळाकार असावी. सभापतींचे आसन उंचावर असावे. सभासपतींच्या आसनासमोर संसदीय सचिव, कामकाजाच्या नोंदी घेण्यासाठी व संसदीय कामकाज पद्धतीबाबत नियमांची जाण असणारी व्यक्ती असेल. सभापतींच्या पाठिशी उभी असणारी व्यक्ती ही सभापतींना आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करणारी व्यक्ती असेल. सभापतींच्या उजव्या बाजूला सत्तारूढ पक्ष तर डाव्या बाजूला विरोधी पक्ष असावा. मार्शल ही सभागृहात शांतता व सुव्यवस्थेसाठी सभापतींच्या आदेशावर कार्य करणारी व्यक्ती असेल. सत्तारूढ-विरोधी पक्षाच्या रांगेमध्ये खूर्च्यांच्या समोर टेबलांची व्यवस्था असावी. प्रत्येकी दोन रांगेत सत्तारूढ व विरोधी पक्ष बसलेला असावा.

३) राज्यभाषा, राष्ट्रभाषा व इंग्रजी या तीन भाषेत सभागृहाचे कामकाज चालू शकेल.

नियोजित युवा संसदेचे कामकाज साधारणत: ९० मिनिटांपर्यंत असावे. हे कामकाज तीन भागात चालेल. हा सभापतींचे आगमन होताच जनगणमन या राष्ट्रगीताने सभागृहाचे कामकाज सुरू होईल. पहिल्या भागात प्रश्नोत्तराचा तास असेल. २०/३० मिनिटांचा कालावधीत दोन-तीन प्रश्नांवर चर्चा व्हावी. प्रश्न व तो प्रश्न विचारण्यामागील भूमिका मांडल्यावर सत्ताधारी पक्षातील मंत्र्यांकडून योग्य त्या उत्तरांची अपेक्षा असेल.

दुसऱ्या भागात देशातील ज्वलंत व तातडीचा विषय ठरणाऱ्या घटनेवर संसदीय कामकाज तहकूब करण्याची सूचना व त्यास पूरक कारणे सादर करतील. ही संबंधित कामकाज तहकुबीची सूचना स्विकारायची की नाही याबाबत सभापती सत्तारूढ पक्षाकडे विचारणा करतील. त्यावर दोन्ही बाजूंनी आपापली मते मांडली जातील आणि अखेर सभापती ती कामकाज तहकुबीची सूचना स्विकारतील किंवा फेटाळतील. कामकाज तहकुबीच्या कार्यभाग १५-२० मिनिटांचा असेल.

शेवटच्या तिसऱ्या भागात पंतप्रधान देशाच्या भवितव्याशी निगडित असणाऱ्या आणि घटनेत दुरुस्ती करण्यास भाग पाडणाऱ्या महत्त्वाच्या विषयावर शासकीय विधेयक सादर करतील. संबंधित शासकीय विधेयकावर पंतप्रधान आपली भूमिका मांडतील व विधेयकाचा तपशील सादर करतील. विरोधी पक्षनेत्याकडून संबंधित विधेयकाबाबत विरोधकांची भूमिका सादर केली जाईल. त्यानंतर सत्तारूढ पक्षातर्फे व विरोधी पक्षातर्फे साधारण तीन तीन व्यक्ती आपले विचार मांडतील. सदर चर्चा सुरू असताना सभागृहातील काही सदस्य सभागृहाची शिस्त व शांततेचा भंग करतील. अशोभनीय वर्तन करीत असल्यास सभापती मार्शलकरवी त्या सभासदांची सभागृहातून हकालपट्टी करतील व शेवटी पंतप्रधानांनी सादर केलेल्या महत्त्वाच्या विधेयकावर सभापती आपला निर्णय घोषित करून सभागृहाचे कामकाज या सत्रासाठी थांबवतील.

भाग दोन

मार्गदर्शक नमूना

संसदेत सभागृहाचे कामकाज चालते याची सहभागी युवकांना कल्पना यावी, यासाठी इथे संवादरूपी कामकाज दिले आहे. सहभागी संघ त्यात आपल्या परीने बदल करू शकतात. मात्र हे सादरीकरण करताना संसदेचा कोणत्याही मार्गाने अवमान होणार नाही, याची काळजी घ्यावी.

प्रमुख कलाकार १) सभापती, २) पंतप्रधान ३) तीन ते चार कॅबिनेट दर्जाचे मंत्री व इतर खासदार, ४) विरोधी पक्षनेते व तीन ते चार प्रमुख खासदार.

प्रत्यक्ष कामकाज

(चोपदार हातात राजदंड घेऊन येतो. तो 'सभापती महोदयऽऽ' अशी ललकारी देतो व राजदंड सभापतींच्या आसनासमोरील टेबलावर ठेवतो. त्याबरोबर सभागृहातील सर्व सदस्य जागेवर उभे राहून सभापतींना अभिवादन करतात. त्याचवेळी ५८ सेकंदाचे राष्ट्रगीत सादर होते. राष्ट्रगीत संपल्यावर सभापती व सदस्य आपापल्या जागेवर आसनस्थ होतात.

प्रश्नोत्तराचा तास

पंतप्रधान : सभापती महोदय, मी पंतप्रधान आनंदराव कल्याणजी यादव. मी सभागृहाला माझ्या चार सहकारी मंत्र्यांची ओळख करून देत आहेत. हे आहेत गृहमंत्री भक्तवत्सलम नायर, (नायर उभे राहून सभापतींना अभिवादन करतात.) हे आहेत मानव संसाधन मंत्री डॉ. सतीशचंद्र बॅनर्जी, (तेही सभापतींना अभिवादन करतात.) या आहेत आरोग्य, महिला व बालविकास मंत्री सुखबाई गोविंदराव लातूरकर (त्याही वरील सदस्यांप्रमाणेच अभिवादन करून स्थानापन्न होतात) आणि हे आहेत ऊर्जा व पर्यावरण मंत्री भिखुलाल छगनलाल मोदी. (तेही अभिवादन करतात.)

विरोधी पक्षनेते : *मी विरोधीपक्ष नेता सोनाचंद हिराचंद जयपुरिया. ही सभागृहाला माझ्या दोन सहकाऱ्यांची ओळख करून देतो. हे आहेत उपनेते अब्दुल हमीद शेख, आणि हे आहेत पक्षप्रतोद लुईस पीटर.* (दोघेही सभापतींना अभिवादन करून स्थानापन्न होतात.)

सभापती : आता प्रश्नोत्तराचा तास सुरू होतोय.

संसदीय सचिव : प्रश्न क्रमांक ७१२.

विरोधी पक्षातील सदस्य ज्ञानराज बुद्धिवाला जोशी : *मान. सभापती महोदय, आज देशात शिक्षणक्षेत्रात फार मोठी विसंगती दिसत आहे. श्रीमंत मुलांच्या शाळा आणि गरीब मुलांच्या शाळा यांत प्रचंड तफावत आहे. समान शिक्षण, समान संस्कार व गुणवत्ता यांबाबत खूप मोठी चिंता वाटते. एका बाजूला फाईव्ह स्टार शिक्षण संस्थांचे इमले दिसतात. ज्यात प्रवेशासाठी लाखो रुपये मोजावे लागतात तर दुसऱ्या बाजूला गरिबांना छप्पर नसलेल्या, गळती असणाऱ्या योग्य शिक्षकांचा अभाव असणाऱ्या शाळेमध्ये ज्ञान द्यावे लागते. याबाबत या सरकारचे काय धोरण आहे?*

मानव संसाधन मंत्री : सभापती महोदय, नर्सरी, प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत २० कोटी भारतीय आज शिक्षण घेत आहेत. २० कोटी भारतीयांना समान संधी, उत्कृष्ट ज्ञान, सकस आहार, कला-क्रिडा साहित्य, उद्योजकता या विषयांचे धडे, राष्ट्रभाषा ते इंग्रजी भाषा आदी अनेक समस्यांना आम्हाला सामोरे जावे लागत आहे. २० कोटी मुलांचे भविष्य घडवण्यासाठी शासनाने जबाबदारी घ्यायचे ठरवले तर देशाच्या महसूलातील ९० टक्के खर्च शिक्षणावर करावा लागेल आणि ते अशक्य आहे. म्हणून आम्ही पळ काढू इच्छित नाही. पण शिक्षणातून चांगला माणूस घडावा, प्राथमिक शिक्षणाची सर्वांना चांगली संधी मिळावी, गरीब व श्रीमंत विद्यार्थ्यांत भेद राहू नये याबाबत विचार करण्यासाठी आम्ही एक आयोग नेमत आहोत. त्या आयोगाच्या निष्कर्षावर सन २०२०पासून योग्य पावले टाकतील, अशी मी ग्वाही देत आहे.

विरोधी पक्षाकडून उपप्रश्न : *सभापती महोदय, सत्तारूढ पक्षाचे हितसंबंध देशातील पूंजीपतींशी निगडित आहेत. एका बाजूला अंबानी, अदाणी, महिंद्रा, बिर्ला, ऑबेरॉय, बारामतीकर, सैफईवाला यांची लूटमार करणारी दुकाने सुरू आहेत. आणि दुसऱ्या बाजूला गरिबांना ज्ञान द्यायला चांगली साधने नाहीत. हे जर असेच चालले तर या देशात माओवादी, नक्षलवादी, बोडोवादी यांची फौज निर्माण होईल तेव्हा या प्रश्नाचे उत्तर कोण देणार?*

सभापती : विरोधी पक्षाच्या वतीने मांडले जाणारे मुद्दे महत्त्वाचे आहेत. पण मूळ प्रश्नाशी तो सुसंगत नाही. तरीही त्याची योग्य

दखल सत्तारूढ पक्षाने घ्यावे व प्रश्नोत्तरानंतर विरोधी पक्षातर्फे पुढील प्रश्न विचारण्यासाठी मी परवानगी देत आहे. त्या प्रश्नाला गृहमंत्र्यांनी नंतर उत्तर द्यावे. आता पुढील प्रश्न घ्यावा.

संसदीय सचिव : प्रश्न क्रमांक ७१३.

विरोधी पक्षातील सदस्या ममता मायावती पटेल : *माननीय सभापती महोदय, आज काश्मीरमध्ये अशांतता आहे. कित्येक महिने संचारबंदी व १४४व्या कलमाचा आदेश देण्यात येत आहे. जनजीवन व्यस्त आहे. पूर्वांचलमध्ये उल्फा व बोडो व नागा बंडखोर उठाव करीत आहेत. अरुणाचल प्रदेश चीनच्या नकाशावर दिसू लागला आहे. द्रविडी भारतातील जनता आर्यन संस्कृतीमुळे दबली जात आहे. देशाच्या काही भागात मराठे, पाटीदार, जाठ, गुर्जर, दलित विविधस प्रश्नांवर उठाव करीत आहेत. या प्रश्नांकडे शासन गांभीर्याने पाहत नाही. यामुळे देशात यादवी निर्माण होईल. याबाबत शासकर्त्यांचे धोरण काय आहे?*

गृहमंत्री : मान. सभापती महोदय, हा प्रश्न गंभीर आहे याची आम्हाला जाणीव आहे. या गंभीर प्रश्नाची जाण विरोधी पक्षापेक्षा आमच्या पंतप्रधानांना अधिक आहे. देशांतर्गत या ज्वलंत प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी पंतप्रधानांना थोडा अवधी द्यावा.

(मध्येच विरोधी बाकावरून लक्ष्मणराव कांबळे प्रश्न विचारतात)

लक्ष्मणराव कांबळे : *सभापती महोदय, आमच्या पंतप्रधानांना दुनियेत श्रेष्ठ स्थान मिळवायचे आहे. त्यांचा मुक्काम भारतात असतच नाही. ते परदेशात फिरत असतात. त्यांना जाण असती तर ते स्वत: काश्मीरमध्ये गेले असते, बोडोंना भेटायला आसामात गेले असते, मराठ्यांच्या व पटेलांच्या मोर्च्याला सामोरे गेले असते.*

(सत्तारूढ पक्षातून सदस्य उभे राहतात. एकाच आवाजात)

सदस्य : माननीय सभापती महोदय, विरोधी पक्षाकडे कोणतेच मुद्दे नाहीत. आमचे पंतप्रधान योग्य ते कार्य करीत आहेत. सभागृहात अशा प्रकारचे वक्तव्य आम्ही करू देणार नाही.

(सभापती गोंधळ आवरण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : आपण सगळे जण खाली बसा. गृहमंत्र्यांचे उत्तर अजून संपलेले नाही. गृहमंत्र्यांनी योग्य ते उत्तर द्यावे.

गृहमंत्री : मान. सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की जाटांचे, गुर्जरांचे, मराठ्यांचे व पाटीदारांचे प्रश्न हे आरक्षणासंदर्भात आहेत. हे सोडवायचे असल्यास आम्हास घटनेत दुरुस्ती करावी लागेल. सध्या आम्ही या प्रश्नाचा मागोवा घेत आहोत. तसेच काश्मीरमधील अशांतता आमच्या शेजारच्या देशामुळे निर्माण झाली आहे. बोडो आंदोलन, माओ आंदोलन हे देशातील काही हितसंबंधी मंडळी चालवित आहेत. त्याचा योग्य तो बंदोबस्त करू, असे आश्वासन मी या सभागृहाला देत आहे.

(विरोधक जागेवर उभे राहतात व गृहमंत्र्यांच्या उत्तरावर असमाधान व्यक्त करतात. त्यावर सत्ताधारी सदस्यही उभे राहतात. पंतप्रधान व इतर मंत्री मात्र बसलेले असतात.)

सभापती : सदस्यांनी शांतता राखावी. विरोधी पक्षनेते बोलण्यासाठी उभे आहेत. त्यामुळे विरोधकांनी आपापल्या जागेवर बसावे.

(सर्व सदस्य जागेवर बसतात.)

विरोधी पक्षनेते : *सभापती महोदय, गृहमंत्री आणि मानव संसाधन मंत्री यांच्या उत्तरात आम्हाला भारताचे कोणतेही भविष्य दिसत नाही. बहुमताच्या आणि सत्तेच्या जोरावर ते देशाचे प्रश्न सोडवू शकत नाहीत. या सरकारला प्रश्नांचे गांभीर्य नाही. सभापती महोदय, या देशाच्या सीमाप्रदेशात असणारी आमची राज्ये ही बहुसंख्येने मुस्लीम, बुद्धिस्ट, ख्रिश्चन, आदी अल्पसंख्याक समाजाची आहेत. तसेच काही राज्ये ही आदिवासी परंपरेतील विकासापासून दूर असणारी आणि भवितव्यासाठी तडफडणारी अशा समाजाची ही राज्ये आहेत. या राज्यांतून होणारे अतिरेकी उद्योग कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात दुर्लक्षितता शिक्षण, रोजगार आणि सामाजिक न्याय या भूमिकेतून दुर्लक्षित आहेत. भारत म्हणजे जणू नागपूरभोवती पसरलेला प्रामुख्याने आर्यवंशीय ज्यांची मूळभाषा संस्कृत आहे, त्या भाषेतून निर्माण झालेल्या अन्य भाषा व प्रामुख्याने हिंदी भाषा यांचाच भारत आहे आणि या हिंदी प्रदेशाभोवतीच आम्ही आमच्या देशाची गुलाबी चित्रे रंगवत असतो. अशी सीमाभागातील जनतेची प्रतिक्रिया आम्हाला जाणवू लागली आहे, म्हणून सीमाभागातील या असमतोलासंदर्भात मी संसदेचे लक्ष वेधण्यासाठी काम तहकूबी सूचना मांडत आहे.*

सभापती : सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांना मी विचारीत आहे की सदर काम तहकूबीबाबत आपले मत व्यक्त करा.

पंतप्रधान : सभापती महोदय, आमच्या विरोधी पक्षातील आदरणीय सदस्यांनी लक्ष वेधू शकणाऱ्या महत्त्वाच्या विषयाला स्पर्श केला आहे. मी त्यांच्या विचाराबद्दल व तळमळीबद्दल अभिनंदन करतो. पण सभापती महोदय, सीमाभागातील या प्रश्नांची मूळे फार

खोलवर रुजलेली आहेत. आज विरोधी बाकावर बसणारी मंडळी आमच्या जागी बसून किमान पाच दशकांपर्यंत हा देश चालवत होते. तेव्हाही सदर प्रश्न तितकेच गंभीर होते. त्या प्रश्नांची उत्तरे संसदीय कामकाज तहकूब करून सुटणार नाहीत, तर त्यासाठी अत्यंत कटू निर्णय घ्यावे लागतील. आम्ही या प्रश्नाबद्दल गंभीर आहोत. योग्य वेळी हे प्रश्न सोडवले जातील अशी मी देशाला खात्री देतो. आणि म्हणून तहकूबी सूचना स्वीकारू नये ही माझी सभागृहाला विनंती आहे.

सभापती : पंतप्रधानांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झाले आहे. योग्य वेळी देश या विषयावर मार्ग काढेल असा मला विश्वास आहे, म्हणून मी काम तहकूबी सूचना फेटाळत आहे.

'वसुंधरा बचाव' विधेयक

(संसदीय सचिव सभापतींना एक फाईल देतात. त्यात काही कागद असतात.)

सभापती : देशाचे पंतप्रधान ट्रेझरी पक्षाकडून एक महत्त्वाची घटना दुरुस्ती विधेयक सादर करणार आहेत, त्यास मी संमती देत आहे. तत्पूर्वी पंतप्रधानांना एका निवेदनाची संधी देत आहे.

पंतप्रधान : सभापती महोदय, २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय घटनेचा आणि सरनाम्याचा उद्घोष करीत राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसादांना जे संविधान सादर केले तो काळ आणि आजचा काळ यात प्रचंड अंतर पडले आहे. गेल्या सहा दशकात शेती हेच उत्पन्नाचे साधन असणाऱ्या बहुसंख्य समाजाचा हा देश आजच्यासारखी प्रसारमाध्यमे नसणारा हा देश आधुनिक भारताची तीर्थस्थाने नसलेला हा देश, नियोजनाचा अभाव असणारा हा देश, शिक्षण आणि आरोग्य यांपासून वंचित असणारा हा देश चाळीस कोटींच्या आसपास होता. संसदीय प्रणाली आम्ही नव्याने स्वीकारू लागलो होतो आणि आज ६०-६५ वर्षांनंतर हा देश नागरिकरणाच्या माध्यमातून खेड्यांना ओस करीत पुढे जाऊ लागला आहे. प्रसाराची नवी माध्यमे आलेली आहेत. संगणक, मोबाईल, नवीन तंत्रज्ञान आणि विज्ञान या माध्यमांतून स्वप्नात नसलेली क्रांती आज आपण अनुभवत आहोत. आज कागदांच्या जागी डिजिटल हे माध्यम बनू लागले आहे. लोकांच्या आकांक्षा बदलल्या आहेत. माणसांचे आयुष्यमान वाढलेले आहे. ६० वर्षांपूर्वी माणसांचे सरासरी आयुष्य ५०-५५ होते. आज माणूस सरासरी ७० वर्षांच्या पलीकडे जगू लागला आहे. आजचं पदवीदारांचे केवळ कारखाने ठरू लागलेले शिक्षण हे बदलत्या काळाच्या गरजा भागवू शकत नाहीत, हेही स्पष्ट होऊ लागले आहे. शेतीवर जगणारा समाज त्यांची नवी पिढी मग ती पटेल-पाटीदार असोत, पाटील-मराठे असोत, जाठ असोत, गुर्जर असोत, ठाकूर असोत आदी समाजातील तरुणांची भूक वाढलेली आहे. शिक्षणाने माणूस फक्त मध्यमवर्गीय बनू लागला आहे, तो श्रमापासून पळू लागला आहे. म्हणून या देशामध्ये आम्हाला घटनाकारांबद्दल आदर राखून दलित, आदिवासी, मागासलेल्या जाती या सर्वांची काळजी आहे. ही वसुंधरा वाचली तरच आपण सारे जगणार आहोत. म्हणून २०२०पासून या देशात घटनादुरुस्तीने मला नवीन विधेयक सादर करावे लागणार आहे. त्याबाबत देशातील जनतेने २०१८पर्यंत आपली मते द्यावीत.

सभापती : मी पंतप्रधानांना विधेयक क्र २७२ सादर करण्यास संमती देत आहे

पंतप्रधान : जागतिक तापमानवाढ (ग्लोबल वॉर्मिंग) हा सर्व जगामध्ये अत्यंत चिंतेचा विषय झाला आहे. विशेषत: भारत, चीन, ब्राझिल यांसारख्या देशांमध्ये तो अधिक चिंता करण्याजोगा आहे. संयुक्त राष्ट्रसंघ तसेच कित्येक आंतरराष्ट्रीय मान्यवर संस्थांनी याबाबत आपले अहवाल प्रसिद्ध केलेले आहेत. या अहवालांमध्ये जागतिक तापमानवाढीचा भयावह परिणाम लक्षात घेता, निसर्गाचा ऱ्हास थांबवून सर्व देशांनी यावर ताबोडतोब उपाययोजना करावी, असे सुचविले आहे. अन्यथा, मानव, पशु-पक्षी, निसर्ग आणि अखेरीस सर्व सृष्टीचाच विध्वंस होईल, असा गंभीर इशाराही दिला आहे. याबाबत प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, जागतिक तापमान सुमारे २ अंशापासून ५ अंशापर्यंत सरासरीने वाढेल. परिणामी कित्येक राष्ट्रांमध्ये भयावह दुष्काळ पडतील, पिण्याच्या पाण्याची आणि अन्नधान्याची तीव्र टंचाई भासेल. भारतानेही पॅरिस करार स्विकारला आहे.

या संपत्तीचे पूर्णपणे संरक्षण व संवर्धन करणे आवश्यक आहे. ग्लोबल वॉर्मिंगपासून आपल्या नैसर्गिक संपत्तीचा बचाव अत्यंत आवश्यक आहे. या संदर्भात विधेयकाद्वारे जल, ऊर्जा, वायू, लोकसंख्या, नागरिकीकरण आदी क्षेत्रातील सात व्यक्तींचा आयोग माननीय राष्ट्रपती महोदय, भारताचे सरन्यायाधीश, पंतप्रधान, लोकसभा सभापती व विरोधी पक्षनेत्यांद्वारा प्रत्येक पाच वर्षांसाठी नियुक्त केला जाईल. जल, ऊर्जा, वायू, पर्यावरण, शहरीकरणे, समुद्र, ध्वनी आदी संदर्भात वसुंधरा रक्षणासाठी वसुंधरा आयोग ही सर्वोच्च समिती असेल व त्याचे निर्णय बंधनकारक राहतील.

विरोधी पक्ष उपनेते : *वसुंधरा रक्षण विधेयकापूर्वी सरकारने प्रामाणिक राहावे. पूंजीपतींचे लाड करण्यासाठी व सत्ताधारी पक्षाला पैशाचा भयानक मोह झाल्याने देशात हे भयानक चित्र आहे.*

सत्ताधारी सदस्य : आम्ही पूंजीपतींचे लाड करत नाही. तुम्हीच करता.

(दोन्ही बाजूचे सदस्य उभे राहतात. विरोधी पक्षातील एक सदस्य आपली जागा सोडून पुढे येतात. त्याचप्रमाणे सत्ताधाऱ्यातील एक सदस्य (मंत्री नव्हे) पुढे येतात.)

सभापती : मी दोन्ही सदस्यांना आपापल्या जागेवर जाण्याचा आदेश देत आहे.

(दोघेही सभापतींचे न ऐकता. एकमेकांसमोर येतात. चर्चेला वेगळे स्वरूप येते.)

सभापती : मी दोन्ही सदस्यांना शेवटची संधी देत आहे. दोघांनीही आपापल्या जागेवर बसावे.

(तरीही ते ऐकत नाही.)

सभापती : मी दोन्ही सदस्यांना या कामकाजात सहभागी होता येणार नाही, असे आदेश देत आहे. अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे यामुळे दुर्लक्ष होत आहे. या दोन्ही सदस्यांना सभागृहाबाहेर काढण्याचे मी मार्शलला आदेश देत आहे.

(मार्शल त्या दोन्ही सदस्यांना बाहेर घेऊन जातात. त्यानंतर शांतता पसरते.)

विरोधी पक्ष नेते : *सभापती महोदय, भारताने आतापर्यंत धरणांवर कोट्यवधी रुपये खर्च केले असून, भारत हा आजमितीस जगातील सर्वाधिक धरणे असलेला देश आहे. विविध कार्यक्रम राबवूनसुद्धा जे पाणी निसर्ग देतो त्यापैकी जेमतेम १० टक्के पाणी आपण उपयोगात आणू शकतो. उरलेले पाणी वाहून वाया जाते. त्याची वाफ होते किंवा काही प्रमाणात पृथ्वीच्या पोटात मुरते. त्यासाठी शास्त्रीय पद्धतीने देशभर पाणलोट क्षेत्र विकसित करणे आणि कोणत्याही परिस्थितीत आगामी पाच वर्षांमध्ये ते पूर्ण करणे आवश्यक आहे. पण त्यासाठी हे सरकार काय करणार आहे, याबद्दल काहीच सांगत नाही.*

पर्यावरणाच्या रक्षणासाठी किमान १/३ क्षेत्र सतत वनाखाली किंवा वनश्रीखाली असणे अत्यंत आवश्यक आहे. भारतातील सुमारे २२ टक्के जमीन ही वनखात्याच्या मालकीची आहे. ही सर्व जमीन विविध प्रकारच्या वनाखाली आणली पाहिजे. त्यासाठी सरकारकडे काय योजना आहेत, हे आम्हाला कळले पाहिजे.

वनसंपदा मंत्री : माझ्या आग्रहानुसार सुरू केलेला संयुक्त वन व्यवस्थापनेचा कार्यक्रम लोकसहभागातून राबविल्यास वना खात्याचे सर्व क्षेत्र सदाहरित राहील, या क्षेत्रातील आदिवासी व गरीब लोकांना तेथे निर्माण होणारा चारा, फळे, फुले, सुकलेले लाकूड हक्काने मिळेल आणि झाडे तोडण्यासाठी तयार झाल्यानंतर त्यांची निम्मी किंमत गावाला मिळेल. भूमीहिनांना सुद्धा दुग्धव्यवसाय करता येईल आणि त्यांचे जीवनमान सुधारेल. विशेषत: वनसंवर्धनाबरोबरच राष्ट्रीय उत्पन्नातही वाढ होईल.

एकूण ३३ टक्के वनश्रीखाली राहण्याकरिता आमचे सरकार खाजगी क्षेत्रातील किमान ११ टक्के क्षेत्र आंबे, काजू, नारळ, वड, पिंपळ, फणस, कडुनिंब आदी वनश्रीखाली आणणार आहे. कोणत्याही परिस्थितीत जागतिक तापमानवाढीविरुद्धची लढाई जिंकण्यासाठी व आपली वसुंधरा वाचविण्यासाठी देश सदैव हरित ठेवणे क्रमप्राप्त झाले आहे. त्या दृष्टीने आमच्या सरकारने सकारात्मक पावले उचलली आहेत. यंदा चांगला पाऊस झाला तर त्याचे मूर्त स्वरूप साऱ्या देशाला पाहायला मिळेल. त्यामुळे आम्ही काहीच करत नाही, हा विरोधकांचा आरोप निराधार आहे.

विरोधी पक्ष सदस्य : *सभापती महोदय, वन मंत्र्यांनी वनांबद्दल सभागृहाला सांगितले पण सध्या जगामध्ये व भारतामध्ये मोठी शहरे निर्माण करण्याची भयावह शर्यत लागली आहे. त्यासाठी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. अशा मोठ्या शहरांमुळे झोपडपट्ट्या, वाहतूक व पिण्याच्या पाण्याची समस्या तीव्र होईल, ध्वनी, जल व वायूचे अनिर्बंध प्रदूषण होईल. त्याचा विचार झालेला दिसत नाही.*

ऊर्जा व पर्यावरण मंत्री : सभापती महोदय, आज देशाला मोठमोठ्या शहरांची गरज नाही, तर विकेंद्रीकरणावर भर देत त्या शहरातील लोकसंख्या कमी करून नवी आदर्श सुंदर अशी छोटी शहरे निर्माण करणे आवश्यक आहे. प्रत्येक गाव आत्मनिर्भर करण्याचा निर्धार केला व त्याच ठिकाणी नोकरीची साधने, अद्ययावत शिक्षण, आरोग्य आदी सुविधा दिल्या, तर शहराकडे कोणीही येणार नाही. म्हणून आम्ही स्कील डेव्हलमेंटची योजना आणली. गावातच रोजगार निर्माण करण्यावर आमचा भर आहे. अशा विकेंद्रीकरणातून शाश्वत विकास करून तापमानवाढीच्या आव्हानाला सामोरे जाता येणार आहे.

विरोधी सदस्य : *सभापती महोदय, पर्यावरणाचा संबंध पाण्याशीही आहे. आपल्याकडे पुरेसा पाऊस पडूनही दरवर्षी देशातील कुठल्या ना भागात कोरडा दुष्काळ पडतोच. सरकारकडे त्याबाबत काही योजना आहेत काय? कारण केवळ घटना दुरुस्ती करून पर्यावरणाचा प्रश्न सुटणार नाही. हा प्रश्न लोकसहभागातून सुटला पाहिजे. त्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाला यात कशाप्रकारे समाविष्ट करून घेतले जाणार आहे, हे सरकार सभागहाला सांगेल काय?*

जलसंधारण मंत्री : सभापती महोदय, पाणी वाचविण्याबाबत पाण्याच्या थेंबाथेंबाचा वापर चांगल्या तऱ्हेने करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या मोहिमेबरोबरच पाण्याचा प्रत्येक थेंब शास्त्रीय पद्धतीने पिण्यासाठी अथवा शेतीसाठी किंवा उद्योगासाठी वापरले जाईल, अशी काळजी घेऊन प्रत्येक लीटर पाण्यावर कर बसवला जाणार आहे. त्याचबरोबर सर्व सिंचनाखालील शेतामध्ये ठिबक अथवा तुषार सिंचनाची सक्ती करणार आहोत.

पाण्याचा पुन्हा पुन्हा वापर करण्यासाठी उपाययोजना करून सर्व उद्योगधंदे, संबंधित नगरपरिषदा व महानगर पालिका यांच्यावर सक्ती केली जाणार आहे. इमारतींच्या छपरावर पडणारे पावसाचे पाणी जागीच साठविल्यास वर्षातील किमान शंभर दिवसांच्या पाण्याची गरज भागविता येते. योग्य सवलती देऊन हा कार्यक्रम सर्वत्र राबविण्यात यावा म्हणून आम्ही लोकांना प्रोत्साहित करीत आहोत. सरकारच्या माध्यमातून यासाठी आम्ही अनेक सवलती देऊ केल्या आहेत.

भारताला सुदैवाने ७ हजार किमी.चा समुद्र किनारा लाभलेला आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून समुद्राचे खारे पाणी गोड्या पाण्यात रुपांतरीत करता येते. हा उपक्रम स्वस्त व्हावा म्हणून भावी गरज लक्षात घेता त्यावरील संशोधन सुरू करावे, म्हणून आम्ही आयआयटीतील विद्यार्थ्यांना या उपक्रमास सहभागी करून घेणार आहोत.

विरोधी पक्षातील सदस्य : *भावी काळामध्ये खाणीमधून लोखंड किंवा इतर खनिज पदार्थ मिळणे केवळ अशक्य होणार आहे. सुपीक जमिनीतील माती विटा तयार कण्यासाठी मिळणार नाही. साहजिकच अशा प्रकारचे साहित्य मिळणार नसल्यामुळे वूडन हाऊसिंग म्हणजेच लाकडी घरांची संकल्पना स्वीकारावी. योग्य नियोजन करून व्यापक प्रमाणात गावागावांत चांगल्या प्रकारे वनशेती करावी. सर्व घरांसाठी लाकूड अथवा बांबू वापरायचे ठरविल्यास फार मोठ्या प्रमाणात त्यांची निर्मिती करावी लागेल. भारतात सुमारे ५० टक्के क्षेत्र पडीक अथवा नापीक आहे. अशा ठिकाणी अन्नधान्य पिकवण्याबरोबरच व्यापक प्रमाणात झाडे व बांबू लावण्याचा संकल्प राबविण्यात यावा. गावांच्या व शहरांच्या उपयोगासाठी जे लाकूड लागते ते गावातच निर्माण करू. अशा तऱ्हेने आत्मनिर्भरतेची कल्पना रुजवून पर्यावरणाशी सुसंगत घरे निर्माण केल्यास पर्यावरणाला घातक असे वायूनिर्मितीचे कार्य निश्चितच रोखता येईल, त्यासाठी 'पर्यावरणाशी सुसंगत घरे' अशी संकल्पना सर्व जगाने राबविली पाहिजे.*

ऊर्जा व पर्यावरण मंत्री : पुढील ४०-५० वर्षांनंतर खनिज तेल व कोळसा मिळणे संकटात येऊ शकेल. ग्रीडमधून विजेचा पुरवठा करण्यासाठी लागणाऱ्या तारा, खांब वगैरे उभारणेही अशक्य होईल. म्हणूनच विविध प्रकारे अपारंपरिक व विकेंद्रित पद्धतीने ऊर्जा निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे. प्रचलित साधनांचा वापर करून अशा पद्धतीने ऊर्जा निर्मिती केल्यास भारत देश ऊर्जेच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण होईल. दिवसेंदिवस ऊर्जेची टंचाई वाढत जाणार हे उघड आहे. अशा परिस्थितीत 'ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण गाव' ही संकल्पना देशाने स्वीकारली पाहिजे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असणारा जैवकचरा (बायोमास), जनावरांचे मलमूत्र, सतत वाहणारा वारा आणि सूर्यापासून मिळणाऱ्या ऊर्जेचा वापर करण्यासाठी शासनाने सर्व प्रकारच्या सुविधा द्याव्यात. ही अपारंपरिक ऊर्जानिर्मिती कमी खर्चात व्हावी, म्हणून सातत्याने संशोधन होणे आवश्यक आहे. त्याकडे अद्यापही लक्ष देण्यात आलेले नाही. भावी ऊर्जेची गरज लक्षात घेता, अपारंपरिक ऊर्जानिर्मितीवर भर देऊन प्रत्येक गाव ऊर्जेच्या क्षेत्रात आत्मनिर्भर करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यादृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सभापती : या विषयावर पुरेशी चर्चा झाली आहे. आता पंतप्रधानांनी विधेयक सादर करावे.

पंतप्रधान : सध्याच्या चंगळवादी जीवनपद्धतीमुळे मानवी हव्यास व मानवी गरज क्षणाक्षणाला वाढत आहे. संभाव्य संकटापासून मुक्त व्हायचे असेल, तर नवीन प्रकारची जीवनपद्धती स्वीकारणे अपरिहार्य झाले आहे. साधी राहणी व उच्च विचारसरणी कदाचित शक्य होणार नाही, परंतु 'संयमित राहणी आणि उच्च विचारसरणी' हा निर्धार असल्यास ते सहज शक्य आहे. भारताने पाश्चिमात्यांचे अनुकरण करण्याऐवजी अशा प्रकारची जीवनपद्धती स्वीकारण्यासाठी पुढाकार घेऊन सर्व जगाचे नेतृत्व करावे. मानव, पशू, पक्षी, प्राणी, निसर्ग आणि आपली वसुंधरा वाचवायची असेल, तर अन्य पर्याय नाही. म्हणून वसुंधरा रक्षणासाठी सर्वोच्च आरोग्याचा आपण स्वीकार करावा असे आवाहन करतो आणि हे विधेयक सदनाने एकमताने संमत करावे, अशी विनंती करतो.

(सभापतीद्वारा विधेयक मतदानासाठी सादर.)

विरोधी पक्षनेते : *सभापती महोदय, हे विधेयक कुणा पक्षासाठी किंवा कुणा घटकासाठी नाही. हे विधेयक समस्त वसुंधरेसाठी आहे. वसुंधरा तगली तर आपण आणि आपल्या पुढील पिढ्या जगणार आहेत. अशावेळी सर्व देशाने सरकारच्या मागे खंबीरपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे. हा देश आपला आहे. तो आपणच वाचवला पाहिजे. त्यासाठी आम्ही सरकारला संपूर्ण सहकार्य देऊ.*

पंतप्रधान : जमीन, पाणी, वने, विविध प्रकारच्या वनस्पती, पशुधन, समुद्र किनारा, सतत वाहणारा वारा आणि प्रखर सूर्यप्रकाश ही भारताची खास संपत्ती आहे. या संपत्तीच्या रक्षणासाठी आम्हास काही कटू निर्णय घेणे भाग आहे. योग्य वेळी आम्ही वसुंधरा

रक्षणाचे विधेयक पारित करून कायदे करू शकलो नाही तर भावी पिढी आपल्याला कधीही क्षमा करणार नाही. आज पाण्यावरून राज्याराज्यांतले तंटे मिटू शकत नाहीत. अनेक वेळा सर्वोच्च न्यायालयाचे आदेशही मानले जात नाहीत. म्हणून एक आयोग गठीत करून त्यांना संपूर्ण अधिकार देत आहोत. त्या आयोगाचा मसुदा आवश्यक वाटल्यास घटना दुरुस्तीसाठी देशासमोर सादर केला जाईल. सर्व राज्यसरकारांची संमती घेतली जाईल आणि घटना दुरुस्तीसाठी आवश्यक औपचारिकता आम्ही पूर्ण करू, असे आश्वासन देऊन हे प्रारूप मी सदनात पटलावर ठेवत आहे.

सभापती : आता आपण या विधेयकाविषयी मतदान घेऊ. ज्यांचा या विधेयकाला पाठिंबा असेल त्यांनी 'होय' म्हणावे, ज्यांचा विरोध असेल त्यांनी 'नाही' म्हणावे. वसुंधरा रक्षण विधेयक संमत केले जावे की नाही?

सर्व सदस्य : (एका आवाजात) होय.

सभापती : 'होय'चे बहुमत. 'होय'चे बहुमत. वसुंधरा रक्षण विधेयक संमत झाले असे मी जाहीर करतो आणि संसदेचे हे सत्र संपल्याचे जाहीर करतो.

(सभापती जागेवरून उठल्यावर चोपदार राजदंड घेऊन त्यांच्यामागून निघून जातो.)

त्यानंतर दोन्ही बाजूचे सदस्य एकमेकांना भेटत, हास्यगप्पा करत निघून जातात.

भाग दोन
मार्गदर्शक नमूना

संसदेत सभागृहाचे कामकाज चालते याची सहभागी युवकांना कल्पना यावी, यासाठी इथे संवादरूपी कामकाज दिले आहे. सहभागी सत्तारूढ अथवा विरोधी पक्ष समूह त्यात आपल्या परीने बदल करू शकतात. मात्र हे सादरीकरण करताना संसदेचा कोणत्याही मार्गाने अवमान होणार नाही, याची काळजी घ्यावी. प्रमुख कलाकार १) सभापती, २) पंतप्रधान ३) तीन कॅबिनेट दर्जाचे मंत्री व इतर चार खासदार, ४) विरोधी पक्षनेते, ५) गटनेते ६) प्रतोद व चार खासदार.

प्रत्यक्ष कामकाज

(चोपदार हातात राजदंड घेऊन येतो. तो 'सभापती महोदयऽऽ' अशी ललकारी देतो व राजदंड सभापतींच्या आसनासमोरील टेबलावर ठेवतो. त्याबरोबर सभागृहातील सर्व सदस्य जागेवर उभे राहून सभापतींना अभिवादन करतात. त्याचवेळी ५८ सेकंदाचे राष्ट्रगीत सादर होते. राष्ट्रगीत संपल्यावर सभापती व सदस्य आपापल्या जागेवर आसनस्थ होतात.)

'निर्माणदूत' विधेयकाचे सादरीकरण

(संसदीय सचिव सभापतींना एक फाईल देतात. त्यात काही कागद असतात.)

सभापती विश्वजीत माळवणकर : या सभागृहात सादर करण्यासाठी रोजगार २०१९ 'निर्माणदूत' या नावाने अशासकीय विधेयक ज्ञानराज जोशी यांच्याकडून प्राप्त झाले आहे. सदर रोजगार २०१९ हे विधेयक सभागृहाच्या पटलावर सादर करण्यास व त्यावर चर्चा करण्यास मी संमती देत आहे.

विरोधी पक्षाचे उपनेते ज्ञानराज जोशी : *सभापती महोदय, ३३ कोटी लोकसंख्या घेऊन भारत नावाचा आपला देश १९४७ साली स्वतंत्र झाला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी गांधींच्या स्वप्नातला नवा देश निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी डॉ. राजेंद्रप्रसाद यांना जो घटनेचा सरनामा सादर केला त्या सरनाम्यातील संकल्पनेला बळकटी देण्यासाठी आणि हा देश या देशातील युवाशक्तीला रोजगार देण्यासाठी मी रोजगार २०१९ हे विधेयक सादर करण्यासाठी मी प्रथम माझी विधेयकाची प्रस्तावना सादर करत आहे. सभापती महोदय, शेकडो वर्षांची अंधश्रद्धा, गरिबी, उपासमार, रोगराई, अज्ञान, विषमता नशिबी घेऊन आमचा देश जन्माला आला. अर्थात, विविधता, सांस्कृतिक वारसा, नैसर्गिक सुंदरता, विभिन्न ऋतु, विभिन्न भाषा व बोलीभाषा, विविध धर्म, विविध आध्यात्मिकता आणि त्यांचे उद्‌गाते यांनी खूप काही चांगले विचार देशाला दिले.*

आपल्या देशाला आशय होता पण आकार नव्हता, राजेरजवाडे होते, पण सार्वभौमत्व नव्हते, देशात अनेक ध्वज होते पण एक राष्ट्रध्वज नव्हता, देशात लिखित कायदेकानून व परंपरा होत्या पण एक अधिकृत संविधान नव्हते, त्या देशाला आम्ही संविधानाने राष्ट्रध्वज दिला, जन-गण-मन च्या ह्रपाने राष्ट्रगीत दिले, २६ जानेवारी १९५० रोजी संसदीय प्रणाली दिली, मतांचा अधिकार दिला. लोकशाही मंदिर उभारले. त्या गांधींच्या, भीमबाबाच्या, जवाहरच्या भारत देशाने पाया भक्कम बनवला. गरिबीशी लढण्यासाठी, कृषिक्षेत्राला, औद्योगिक क्रांतीला, शैक्षणिक चळवळीला, दळणवळणाच्या साधनांना नवा आशय देत विकासाला पूरक ठरणाऱ्या तीर्थस्थानाची निर्मिती आम्ही केली. कोयना, भांक्रा, जायकवाडी, भिलाई, तारापूर ही आमची नवी मंदिरे ठरू लागली सत्तर वर्षात या देशात काय झाले याचा पंचनामा करण्यापूर्वी ३० कोटींचा भारत आज १३० कोटींपर्यंत पोहोचला आहे. अनेक सरकारे आली आणि गेली. या सभागृहात पारित झालेली विधेयके, घटना दुरुस्त्या, कायदे कानून या सर्वांचे साक्षीदार या सभागृहाच्या भिंती आहेत. या भिंतींनी प्रामाणिकपणा व अप्रामाणिकपणा दोन्ही नोंदवल्या आहेत. आज या देशात भूकबळी जाणवत नाही. याचे कारण या देशाला आम्ही दिलेली रोजगार हमी आणि अन्नसुरक्षा हे महत्त्वाचे वरदान ठरले आहे. आमच्या यापूर्वीच्या विविध नेतृत्वाने हरित क्रांती, श्वेतक्रांती, देवी, मलेरिया, कृष्ठ रोगाचे निर्मूलन साक्षरतेचे प्रमाण याबाबत गौरवास्पद कार्य केले आहे. माहितीचा अधिकार देशाला दिला. मानवी हक्कांची मंदिरे बनवली आहेत. महिला, ओबीसी, अल्पसंख्यांक आदींना सत्तेत भागिदार बनवले आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येत, लक्षणीय घट केली आहे. जगातील सर्वाधिक मोबाईलधारक या देशाने दिले आहेत. विज्ञान-तंत्रज्ञान व अवकाशातील झेप महत्त्वाची ठरली आहे. मात्र कौतुकास्पद आणि नोंद घेण्याच्या घटनाक्रमाबरोबर आम्हाला देशातल्या शिक्षित तरुणांच्या किंकाळ्यांना सामोरे जावे लागणार आहे.

सभापती महोदय, शिक्षणाचा प्रसार झाला, प्रचार झाला. त्याचबरोबर लाखोंच्या संख्येत आम्ही बेरोजगारांची फौज या देशात निर्माण करू लागलो आहोत. आम्ही जर शिक्षितांच्या रोजगारीचा प्रश्न सोडवला नाही तर या देशात काही वर्षांनी वर्गसंघर्षही निर्माण होऊ शकतील. तरुणाईची वाढती निराशा ही देशाला विकृतीकडे घेऊन जाईल. पोटाची खळगी भरण्यासाठी प्रामुख्याने शहरी करोडोंच्या संख्येला आम्ही दिशा दिली नाही आणि केवळ शब्दफेकीचे, खोट्या आश्वासनांचे, मृगजळाचे चित्र निर्माण करीत राहिलो तर आमच्या विकासाच्या मंदिरावर हल्ले होऊ शकतील. ही लोकशाही धोक्यात येऊ शकेल. आज देशात रस्तोरस्ती लाखोंच्या संख्येने

तरुणांचे मोर्चे आरक्षणासाठी आणि रोजगारासाठी भडकू लागले आहेत. त्या मोर्च्यांना नटसम्राटाच्या भूमिकेतून सुंदर शब्दांची आश्वासनांची खैरात करून प्रश्न सुटणार नाही. म्हणून मी माझे रोगजार २०१९ 'निर्माणदूत' हे खासगी विधेयक सभागृहात सादर करीत आहे.

१) रोजगार २०१९ या विधेयकाअंतर्गत आमच्या सर्व विद्यापीठांच्या मार्फत दिल्या जाणाऱ्या पदवी प्रमाणपत्रावर खालील उल्लेख करावा व आम्ही दिलेली पदवी वा शिक्षण म्हणजे रोजगाराची हमी नाही ते फक्त प्राप्त केलेल्या ज्ञानाच्या संदर्भातील प्रमाणपत्र असेल.

२) देशातील शिक्षण पद्धतीत बदल घडवित या पुढे १४ वयोमर्यादेपर्यंत सक्तीने आवश्यक तिथे मोफत व किमान समान ज्ञान देणारी शिक्षणप्रणाली असेल.

३) विषमतेची दरी निर्माण न करणारी राज्यभाषा, राष्ट्रभाषा व इंग्रजी भाषा यांचा समतोल साधणारी व्यवस्था निर्माण व्हावी. वयाच्या १६ वर्षानंतर १०वी किंवा १२वीनंतर सरसकट विज्ञान, वाणिज्य वा कला विषयाकडे वाढणारा ओघ कमी करून उद्योग, स्वयंउद्योग वा सेवेच्या क्षेत्रातील ज्ञानाची नवीन व्यवस्था निर्माण करण्यात ज्यायोगे नव्या युवकाच्या आवडीनिवडीनुसार, त्याच्या क्षमतेनुसार आमचा नवा तरुण रोजगाराला पूरक अभ्यासक्रम किंवा कार्यानुभव प्राप्त करून आपल्या जीवनाला नवे वळण देऊ शकेल.

४) या संदर्भातील राहिलेल्या मसुद्यातील अन्य तपशीलाबाबत निर्णय घेत असताना मी सर्वात महत्त्वाचा आग्रही मुद्दा मांडत आहे की भारतासारख्या खंडप्राय देशात करोडोंच्या संख्येने असलेल्या व युवादेश म्हणवणाऱ्या समाजातील बहुसंख्य युवक हा नोकरीच्या शोधार्थ फिरतो आहे. त्या प्रचंड संख्येला आम्ही वेळीच योग्य संधी दिली नाही, तर निराशा, प्रसंगी अतिरेकीपणा किंवा व्यसनाधीनता वाढीस लागण्याचा धोका आहे. अशावेळी या युवाशक्तीला रचनात्मक दिशा देण्यासाठी निर्माणदूत विधेयकाची गरज वाटते. १८ ते २५ हा वयोगट नवयुवकांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण कालावधी. किमान दहावी वा बारावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या व रोजगाराच्या - स्वयंरोजगाराच्या शोधात असणाऱ्या समाजघटकांस रोजगार प्राप्तीपर्यंत निर्माणदूत बनवून भविष्यासाठी त्यास प्रोत्साहित करता येईल. साधारण महिन्यातील २० दिवसांच्या कालावधीतील रोज सरासरी तीन तास निर्माणदूत सेवेच्या, ज्ञानाच्या व मित्रत्वाच्या भूमिकेत वनराई संवर्धन, जलनिर्माण/बचाव कार्य, सौरऊर्जा प्रसार, रुग्णांच्या/वृद्धांच्या/अपंगांच्या क्षेत्रात सेवाकार्य, नागरी व्यवस्थेत स्वयंसेवी कार्य, पोलिस यंत्रणेस सहाय्य, सर्वेक्षणाची जबाबदारी, आपत्कालीन कार्यात मदत, शैक्षणिक कार्यात सहभाग यापैकी विशिष्ट क्षेत्रात टार्गेट ठरवून सेवा देतील (सेवा घेतल्या जातील). त्यासाठी राष्ट्र त्यास मासिक रुपये तीन हजाराचे मानधन देईल व दोन वर्षांच्या निर्माणदूत कार्याबरोबर युवा घटक अन्य वेळेत स्वत:चा विकास करून आत्मनिर्भरतेसाठी संकल्प करेल व स्वयंसिद्धतेकडे वाटचाल करेल.

थोडक्यात रोजगार २०१९ 'निर्माणदूत' या अन्वये पहिल्या टप्प्यात देशातील किमान २ कोटी शिक्षित तरुणांना सरासरी २० दिवसांच्या कालावधीत ६० तासांची सेवा घेऊन त्यास स्वयंपूर्ण बनण्यासाठी हमी द्यावी व त्या हमीसाठी त्या तरुणवर्गाची सेवा शासन, निमशासन व खाजगी क्षेत्रामार्फत उपलब्ध करून द्यावी.

मानव संसाधन मंत्री डॉ. सतीशचंद्र बॅनर्जी : सभापती महोदय, रोजगार २०१९ या ज्ञानराज जोशी यांनी मांडलेल्या विधेयकामागील तळमळीची आम्हाला जाण आहे. २ कोटी तरुणांना मासिक तीन हजार रुपयांप्रमाणे आर्थिक व्यवस्था देऊन त्यांच्याद्वारे सेवा घ्यावी किंवा सेवेची संधी द्यावी मला गरज वाटत नाही. याचे कारण आमच्या कर्तबगार पंतप्रधानांमुळे देशाच्या विविध राज्यांतून काही लाख कोटींच्या गुंतवणुकीचे एमओयु सुरू आहेत. त्या एमओयुप्रमाणे म्हणजेच सामंजस्य कराराप्रमाणे निर्माण होणाऱ्या उद्योगातून आमच्या मते देशात ३ ते ४ कोटी युवकांना रोजगाराची संधी मिळणार आहे. अर्थात त्यासाठी तरुणांना सबुरीने घ्यावे लागणार आहे. कौशल्य विकास, स्टार्टअप, न्यू इंडिया आदी अनेक योजनांच्या द्वारा आणि पंतप्रधानांच्या 'मन की बात' द्वारा देशात चेतना निर्माण झाली आहे. माझे तर विरोधी पक्षाला सांगणे आहे की त्यांनी रोजगार निर्मिती राष्ट्रीय कर्तव्य मानून पंतप्रधानांच्या योजनांना साथ दिली पाहिजे. जोशींच्या खाजगी विधेयकामुळे सरकारच्या तिजोरीवर पडणारा ताण मोठा असेल. ३ तासाच्या सेवेतून फार काही साध्य होईल असे आम्हाला वाटत नाही. म्हणून सदर विधेयक मागे घ्यावे असे माझे मत आहे.

विरोधी सदस्य [illegible] : *सभापती महोदय, ज्ञानराज जोशींच्या खाजगी विधेयकाला सभागृहाने पाठिंबा द्यावा असे आम्हास वाटते. आज देशात ४० टक्के युवा दहावी-बारावीनंतर उच्च शिक्षण न घेता नोकऱ्यांच्या शोधात फिरत आहेत व उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांपैकी ६० टक्के तरुण आज रोजगारासाठी भटकत आहेत. महाराष्ट्रात मराठा क्रांती मोर्चे, गुजरातमध्ये पाटीदारांचे मोर्चे, कर्नाटकात लिंगायतांचे मोर्चे, हरयाणातील जाटांचे मोर्चे, राजस्थानातील गुर्जरांचे मोर्चे तुम्हाला दिसत नाहीत का? आरक्षणासाठी आपणास मोर्चे दिसतात पण त्यामागे शिक्षितांची बेकारी हे महत्त्वाचे कारण आहे. शैक्षणिक कालावधी संपल्यावर तरुणांना आम्ही कार्यमग्न करू शकतो नाही, तर मोकळ्या डोक्यात अविचाराचे थैमान सुरू होते. तरुणवयात निराशा येणे हे प्रगतीच्या दृष्टीने मारक ठरते. रोजगार २०१९ 'निर्माणदूत' या विधेयकात व्यक्त केलेल्या मताशी मी सहमत आहे. त्याचे कारण म्हणजे आम्हाला मिळणारे*

ज्ञान हे केवळ पुस्तकी ठरले आहे. आमचा नवा युवा भारत हा व्यवहारज्ञानापासून दूर आहे. तेव्हा चार तासाच्या आमच्या रोजगार हमीमुळे तरुणांना दिलासा मिळेल आणि त्याला मिळणाऱ्या दिलाशामुळे अन्य वेळेत तो नव्या सेवांचं ज्ञान प्राप्त करेल. नव्या वळणावर आपापल्या गावांतून, भागांतून तो तरुण अन्य व्यावसायिकांच्या समवेत कामाचा अनुभव घेत स्वत:ही नवा रोजगार निर्माण करू शकेल आणि म्हणूनच रोजगार २०१९ 'निर्माणदूत' द्वारे दोन कोटी तरुणांना तरी आम्ही दोन दोन वर्षांची कामाची संधी देत गेलो तर सकारात्मकतेचा नवा मार्ग आपण त्याला देऊ शकू.

गृहमंत्री भक्तवत्सलम मल्लिकार्जुन नायर : माननीय सभापती महोदय, आमचे पंतप्रधान देशाला जागतिक नकाशावर अग्रणी बनवू इच्छितात. आज सारं जग आमच्या पंतप्रधानांना सर्वात लोकप्रिय आणि दूरदृष्टीचा नेता म्हणून पाहते.

(अर्थमंत्री बोलत असताना विरोधी बाकावरून आवाज येतो, 'आमचे पंतप्रधान, आमच्या अर्थमंत्र्यांना स्वतंत्र भारतातील एकमेव, लोकप्रिय समजत असतील तर त्यांचे आता पुतळे उभे करा. कारण बेरोजगार तरुण त्यांना पुढील निवडणुकीत पुन्हा आपला पंतप्रधान म्हणून पाहू इच्छित नाहीत. पुढच्या निवडणुकीत आमचाच पंतप्रधान असणार आहे.)

सभापती : मी सभागृहातील सदस्यांना सांगू इच्छितो की त्यांनी अर्थमंत्र्यांचे भाषण ऐकून घ्यावे व त्यानंतर आपल्या प्रतिक्रिया द्याव्यात. बेजबाबदार वक्तव्य करून पंतप्रधानांवर चिखलफेक करू नये.

अर्थमंत्री : सभापती महोदय, आज देशात कौशल्यविकास योजनेअंतर्गत आम्ही लाखो तरुणांना कार्यक्षम बनवत आहोत. औद्योगिक जाळे, रस्ते, बंदर, कृषि अशा सर्व क्षेत्रात आम्ही नव्या रोजगारांच्या संधी निर्माण करून देऊ लागलो आहोत. २०२२पर्यंत या देशात कुणीही शिक्षित, बेरोजगार राहणार नाही याची आम्ही काळजी घेतो. जगातील अनेक राष्ट्रे भारतात गुंतवणूक करू लागली आहेत. या गुंतवणुकीबरोबर निश्चितपणे रोजगार वाढणार आहे. सध्या देशात शेतीच्या संदर्भात आम्ही प्रचंड गुंतवणूक करीत आहोत. २०२२पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने वाढणार आहोत. आरोग्याच्या क्षेत्रात आम्ही मोठ्या प्रमाणात नि:शुल्क सेवा देण्याची योजना सुरू केली आहे. त्यामुळे रोजगार २०१९ हे विधेयक हे केवळ बेकारभत्ता ठरेल, त्यातून उत्पादकता फारशी निर्माण होणार नाही व सरकारी तिजोरीवर बोजा वाढेल. देश आर्थिक तुटीच्या दिशेने जाईल म्हणून सदर विधेयकाचा अर्थमंत्री म्हणून सध्या विचार होऊ नये असे माझे मत आहे.

विरोधी पक्षनेते अखिलेश मायाबेन भन्साली : *माननीय सभापती महोदय, जगात आम्ही सर्वात युवा देश म्हणून परिचय देतो. युवा देश म्हणून पाठ थोपटून घेतो. त्या युवक भारतात अलीकडच्या काळामध्ये शिक्षणक्षेत्रात एका बाजूला इतिहास बदलण्याचे, रंग बदलण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि सर्व धर्म भावनेला तडा देण्याचा प्रयत्नही सुरू आहे. हा देश विशिष्ट धर्मीयांचा, विशिष्ट समूहांचाच आहे अशी विचारसरणी दृढ होत चालली आहे आणि समाजातील अल्पसंख्य धर्मीय, जातीय याला दुय्यम मानण्याचा प्रयत्न सुरू झाला तर दुसऱ्या बाजूला ज्ञान, विज्ञानाची, व्यवहारज्ञानाशी सांगड घालण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही. तरुणांना आर्थिकदृष्ट्या स्वप्नपूर्ती बनवण्याचे प्रयत्न आज सत्तारूढ पक्षाकडून केले जात नाहीत. जयंत्या करा, पुण्यतीथ्या करा, सूर्यनमस्कार घाला, धार्मिक संघांच्या नावाने रेल्वे सुरू करा, रेल्वे स्टेशनची नावे बदला, मन की बात सक्तीने ऐका, राष्ट्रगीताबरोबर अन्य राष्ट्रप्रेमाच्या गीतांचे तेढ निर्माण करा, तिरंग्याऐवजी अन्य रंगाचा ध्वजाचा स्वीकार करा, ऐतिहासिक स्थळावरून वाद निर्माण करा, एका अर्थाने लोकशाहीची पुरुटपाबी करा हे सारं आज युवकवर्ग पाहतो आहे. बाजीराव मस्तानी, पद्मावती, जोधा-अकबर आदी चित्रपटांच्या निमित्ताने युवापीढीला विवेकाची कास धरा हे सांगण्याऐवजी न्यायालयाच्या आदेशाचा भंग करा अशी कृती दिसू लागली आहे. आपण आज या देशातील युवांना निराशेच्या गर्तेतून बाहेर काढू शकलो नाही तर भावी इतिहास आपणास कधीच क्षमा करणार नाही.*

आपल्या शेजारी असलेल्या चीनमधील बहुसंख्य युवक आज स्वावलंबी व छोट्या उद्योगात मग्न आहेत. तेथेही बेकारीचे प्रमाण कमी आहे. पण चीनने बेरोजगारांच्या समस्येवर तोडगा काढून त्यांना समर्थ बनवत देशालाही समर्थ बनवले आहे. आज या देशातील संपत्तीची विषम विभागणी झाली आहे. ७० टक्के संपत्ती ही एक किंवा दोन टक्के वर्गाकडे आहे आणि ३० टक्के संपत्ती ही ९८ टक्के वर्गाकडे आहे. संपत्तीच्या या विषमतेमुळेच आमच्या युवा शक्तीला आम्ही आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवले नाही तर देशात १०-१५ वर्षांनंतर असंतोषाचा स्फोट होईल आणि लोकशाहीचे मंदिरही उद्ध्वस्त होईल. आमचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू म्हणत असत 'आराम हराम है।' आणि आज या देशात लाखो तरुण रोजगाराविना आरामात आहेत. या आरामाला आम्ही हराम म्हणणार नाही पण तरुणांना रोजगार न देणाऱ्याला आम्ही हराम म्हटले तर आम्हावर असंसदीय शब्द वापरला म्हणून टीकाटिप्पणी पण होऊ शकते. सभापती महोदय, दूरदृष्टी असेल, या देशाचा पुढील २५ वर्षाचा विचार करणारा शासनकर्ता असेल तर हा १३० कोटींचा देश १५० कोटींच्या जनसंख्येलाही जगवू शकेल इतकी क्षमता आमच्यात आहे. शहरी युवा शक्तीला आम्ही शिक्षण संपल्यानंतर प्रत्येकी किमान वर्षभराच्या आत रोजगार देईपर्यंत सक्षमपणे जगण्यासाठी रोजगार २०१९ या विधेयकात त्रुटी असल्या तरी या विधेयकाच्या निमित्ताने आमच्या सभागृहाने तरुणांच्या रोजगाराच्या संधी देण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. तरुणांच्या स्वप्नांना आम्ही

मदत करू शकलो नाही तर देशातला तरुण मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन बनू शकेल. त्याला कार्यकुशल करण्यासाठी घोषणा नव्हे तर प्रत्यक्ष समाजातल्या उद्योजकांना, कृषिक्षेत्रातील अग्रणींना नव्या वाटा शोधायला भाग पाडले पाहिजे. सभापती महोदय, रोजगार २०१९ 'निर्माणदूत' या विधेयकाच्या पाठीमागील तळमळ विचारात घेऊन सदर विधेयक संसदेच्या समितीकडे दुरुस्तीचा नवा आराखडा तयार करण्यासाठी पाठवावा अशी मी विनंती करतो.

पंतप्रधान नरेंद्र सीताराम गांधी : माननीय सभापती महोदय, मला आनंद वाटतो, रोजगाराच्या अशासकीय विधेयकामुळे या सभागृहात देशातल्या तरुणांबद्दल गंभीरपणे चर्चा करण्याची संधी परत एकदा उपलब्ध होत आहे. सभापती महोदय, रोजगार कुणाला नकोय? रोजगार देण्यासाठी तर आम्ही रात्रंदिवस विचार करत असतो. मी जगभर फिरतो ते कोणी माझा पुतळा बसवावा किंवा कोणी माझा गौरव करावा म्हणून नाही तर जगातील ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि विकासाची साधने या देशात आणावित, या देशाची औद्योगिक भरभराट व्हावी म्हणून माझा प्रयत्न आहे. मी या देशातल्या विविध राज्यांना प्रेरणा देऊन आर्थिक आघाडीवर ती राज्ये सशक्त व्हावीत म्हणून प्रयत्नशील आहे. आमच्या या प्रयत्नात वाहतुकीच्या क्षेत्रात, कृषि क्षेत्रात, संरक्षण क्षेत्रात, आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करून देण्याचे प्रयत्न आम्ही करीत आहोत. या खंडप्राय देशात अनेक वर्ष आमची सत्ता नव्हती. त्या काळातही बेरोजगारी होती. पण आता बेरोजगारीचा बाऊ करून तरुणांच्या मनामध्ये आमचं सरकार काही करत नाही असा खोटा प्रचार या विरोधकांनी सुरू केलेला आहे. यांनी घोटाळे केले म्हणून जनतेने यांना दूर केले. आम्ही योजना करतो म्हणून जनतेने आम्हाला जवळ केले. त्या आमच्या भावनांची पूर्तता आम्ही जरूर करू. चर्चेच्या ओघात आमच्यावर टीकाटिप्पणी करण्यासाठी हर्षद मेहता, विजय मल्ल्या, नित्य मोदी, चोक्सी यांना आम्ही मोठं केलं, यांची साम्राज्य उभी केली असा प्रचार कृपया विरोधी पक्षाच्या सदस्यांनी करू नये. आम्ही आर्थिक गुन्हेगारांना जरूर खेचून आणू आणि बँका या सामान्य तरुणांच्या रोजगाराला पूरक ठरतील याची काळजी घेऊ.

(विरोधी बाकावरून आवाज - आता तरी घोषणा बंद करा. तरुणांना रोजगार द्या किंवा त्यांना बेकार भत्ता द्या. तरुणांना फसवू नका.)

पंतप्रधान : सभापती महोदय, कोण कुणाला फसवतं आणि कोण प्रामाणिक आहे हे जनता ठरवेल. सदर विधेयक कुचकामी आहे, असं आवाज काढतो. पण सदर विधेयक आम्ही फेटाळत आहोत.

सभापती : तरुणांच्या रोजगाराबद्दल सादर करण्यात आलेले खासगी विधेयक, त्यामागील भावनेचा विचार करता महत्त्वाचे आहे. या विधेयकावर सभागृहात सुसंगत चर्चाही झाली आहे. अलिकडच्या काळात रोजगाराचा अभाव असल्यामुळे अनेक ठिकाणी विविध विषयांवरून भयंकर हाणामारी होऊ लागले आहे. सर्वोच्च न्यायालयानेही देशात वाढत चाललेल्या झुंडशाहीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. तेव्हा सदर विधेयक मतदानास टाकतो न टाकता या विधेयकावर संसदीय समितीने गंभीरपणे तरुणांच्या रोजगारासाठी विचार करावा व त्याचा पूर्ण अभ्यास करून अहवालासह आगामी सत्रात सादर करावा. संसदेचे हे सत्र संपल्याचे मी जाहीर करतो.

(सभापती जागेवरून उठल्यावर दोन्ही पदार राजदंड घेऊन त्यांच्यामागून निघून जातो. त्यानंतर दोन्ही बाजूचे सदस्य एकमेकांना भेटत, हास्यगप्पा करत निघून जातात.)

आरक्षणमुक्त भारत २०४७ विधेयक

(सभापती व्यंकटेश अंय्यगार यांचे आगमन. संसद सचिव सभापतींना कागदपत्र देतात.)

सभापती व्यंकटेश अंय्यगार : मी या सभागृहात संसद सदस्य श्री. ज्ञानदेव चैतन्यदा कबीर यांना अशासकीय विधेयक क्रमांक ७८९ तहत आरक्षणमुक्त भारत २०४७ हे विधेयक पटलावर सादर करण्याची अनुमती देत आहे.

ज्ञानदेव कबीर : *मान. सभापती महोदय, सन २०१९च्या हिवाळी सत्रात मी लोकसभा सदस्य श्री. ज्ञानदेव चैतन्यदा कबीर सदर विधेयक भारताच्या भविष्यासाठी आणि जात, धर्म, भाषा, आदींच्या अनाठायी हट्टापायी भारताचे तुकडे होऊ नये म्हणून कळकळीने मी माझे निर्भिड स्वरूपातील विधेयक संसदेला सादर करीत आहे. या विधेयकावर सर्व पक्षांच्या सदस्यांनी सद्सद्विवेक बुद्धीवर आपल्या अंतर्मनाचा शोध घेत एकमताने विधेयकाचे स्वागत करून घटनादुरुस्तीसाठी स्वीकृती द्यावी, अशी अपेक्षा आहे. (संसद सदस्य ज्ञानदेव बोलत असताना अचानकपणे मध्येच दोराईस्वामी यलम्मा नायडू विधेयकाच्या प्रस्तावनेच्या वेळी अडवणूक करतात.)*

श्री. नायडू : माझे विद्वान संसद मित्र श्री. ज्ञानदेव तुम्ही इतके ज्ञानी असाल हे मला माहीत नव्हतं. आजपासून २८ वर्षांनंतर या देशाचे तुकडे होतील असे गृहित धरून तुम्ही संसदेचा वेळ वाया घालवत आहात. भविष्याची चिंता आताच कशाला? इंग्रज राज्य करीत असताना दूरगामी विचार करीत होते. व्यापारही करीत होते. त्या इंग्रजांच्या दूरगामी विचारांमुळे या देशात शंभर शंभर वर्षे टिकलेल्या वास्तू, दळणवळणाची साधने, शिक्षणाची मंदिरे, कायदा व सुव्यवस्थेचे क्षितिजे उभे राहिले. आपल्या संसदेत दूरगामी विचार करणारे संस्कारी आहेत तरी कुठे? रोगावर तात्पुरत्या मलमपट्ट्या लावून सत्तेचा भोग घेणारे त्यांना २०४७ची काळजी असणार आहे का? स्वतःचे पुतळे, स्वतःचे फोटो, नामांतरे, कौटुंबिक स्वार्थ, जातीजातीत भांडणे लावणे, भावनेवर जगायला शिकवणे यात रमणारी माणसे तुम्हाला माहीत असताना तुमच्या प्रामाणिकपणाबद्दल दया येते. म्हणून हे विधेयक तुम्ही मांडता तरी कशाला? २०४७साली आपण जिवंत तरी असणार का? (त्यानंतर पूर्वांचल भारतातील संसद सदस्य हेमनंदन बरुआ उभे राहिले आणि म्हणाले)

हेमनंदन बरुआ : *दोराईस्वामी, आमच्या ज्ञानदेवांचे विधेयक तरी ऐकून घ्या. भविष्याबाबत प्रतिक्रिया देऊ नका. त्यांच्या विधेयकाबाबत उपरोधिक टिका करीत आमच्या पंतप्रधानांना अप्रत्यक्षपणे टार्गेट करणे तुम्हाला शोभते का? त्यांनी कुठेही आपला पुतळा उभारला आहे का? त्यांनी फक्त सरदारांचा पुतळा बसवला आहे. आणि एवढा उंच बसवला की सगळ्या जगात श्रेष्ठ ठरणार... आणि राष्ट्रपिता बापूंना स्वच्छतेचे राजदूत बनवून 'हमारे साथ हमारा विकास'चा नारा देतात.*

(सभापती निघून जातात.)

सभापती : मी सदस्य श्री. ज्ञानदेवांना विधेयक मांडण्याची परवानगी दिली होती. त्या विधेयकाचा मसुदा सादर करत असताना श्री. नायडू आणि बरुआ यांनी ज्ञानदेवांच्या भाषणात मध्येच हस्तक्षेप करण्याचे काहीच कारण नाही. यानंतर ज्ञानदेवांनी न थांबता विधेयकातील मुद्दे मांडत राहिले. तुम्ही तुम्ही.

श्री. ज्ञानदेव : *सभापती महोदय, आज आम्ही १३० कोटींच्या देशात राहतो. ३० वर्षांनी आमची मुले जेव्हा साठीत असतील आणि आमची नातवंडे तुमच्या वयाच्या असतील त्यावेळी हा भारत किमान १६० कोटींचा असेल. स्वातंत्र्याच्या ७० वर्षात आम्ही भारतीयांनी पराक्रम करून दुपटीने लोकसंख्या जवळजवळ चौपट केली आहे. तर पुढच्या ३० वर्षांत लोकसंख्या वाढवण्याचा पराक्रम कमी केला तरीही पुढची ३० वर्षांत आम्ही ३० कोटींची भर घालणारच यात शंका नाही. आज आम्ही फक्त ग्रामीण समाजाला मनरेगाच्या अंतर्गत रोजगार देण्याचा प्रयत्न करतो. त्या महात्मा गांधींच्या नावे चालू असलेल्या रोजगारामुळे साधारण १० कोटी माणसे आपले जगणे जगू शकतात... किमान पोटाची खळगी भरू शकतात. पण आमच्या शैक्षणिक क्रांतीमुळे आज शैक्षणिक कारखान्यांतून कोट्यवधी संख्येत शिक्षणाची प्रमाणपत्रे हातात घेऊन आमचा तरुण दररोज शासनाकडे रोजगारासाठी रांगेत उभा असतो. अर्थात, शैक्षणिक क्रांतीतून मानवी मूल्ये वा गुणवत्ता वा चारित्र्य धारण करणारा सक्षम माणूस निर्माण झाला नाही. याप्रश्नावर निराशाजनक हसू येते. किमान माझ्यासारख्या संवेदनशील व्यक्तीला येतो.*

एकेकाळी डॉ. राधाकृष्णन, झाकीर हुसेन, धोंडो केशव कर्वे, पं. मदनमोहन मालवीय, मौलाना आझाद आणि त्या मार्गावर कन्हैय्यालाल मुन्शीपासून अगदी अब्दुलजींपर्यंत, प्रो. यशपालपासून जे. पी. नाईकांपर्यंत शिक्षणक्षेत्राला दिशा दाखवणारी थोर माणसे आम्ही पहात आलो आणि हल्ली एका बाजूला कार्पोरेट जगतातून लाखोंची लूट करणारी मानवीय संवदेनांचा अभाव असणारी, व्यावसायिक मराठा पुढारी पिढी निर्माण केली जात आहे, तर दुसऱ्या बाजूला गळत्या इमारती, शैक्षणिक साधनांचा अभाव, शिक्षकांची कमतरता आणि निराशाजनक वातावरणात गरिबीतील पिढी निर्माण होत आहे. यामुळे आम्ही विषयमतेलाही खतपाणी

घालत आहोत, यात शंका नाही. या सर्व परिस्थितीत आज देशात करोडोंच्या संख्येने नवयुवक रोजगाराच्या शोधात फिरत आहे. त्यातील बहुसंख्य लोकांना आम्ही स्वयंरोजगारासाठी प्रेरणा न देता केवळ नोकरदार बनवणारी किंवा नोकरीचा आचार देणारी यंत्रणा वाढीस लावली. जपान, चीन, जर्मनीसारख्या देशांतील युवक आज स्वत:च्या व्यवसायात स्वत:चे भविष्य शोधत आहे. पण आपल्याकडे फक्त नोकऱ्यांसाठी शैक्षणिक कारखाने वाढवल्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी रस्तोरस्ती माणसांचे थवे आज आंदोलन करताना दिसत आहेत. देशातील बहुतेक सर्वच समाजघटकांना आता आरक्षण हवे आहे. या आरक्षणावरून देशात चाललेली आंदोलने देशाला फार महाग पडणार आहेत. ६०-७० वर्षे काहींनी आरक्षण मिळविले. आम्हालाही मिळाले पाहिजे. आम्हाला मिळाले नाही तर आम्ही शासनयंत्रणा बंद पाडू, हा देशात चाललेला घोष आम्हाला विचारात घ्यावा लागेल. सामान्यांची किमान आर्थिक भूक भागली नाही तर विविध क्षेत्रांतून अतिरेकी वाढणार आहेत. म्हणून किमान भविष्यात तरी या देशाच्या हातात असणाऱ्या शासकीय सेवेतील जात, भाषा, पंथ, धर्म यांपासून दूर गुणवत्ता, कार्यक्षमता, प्रामाणिकता व सामान्यांच्या बद्दल सद्भावना असणाऱ्यांनाच रोजगाराची संधी देऊन या देशाचा गाडा समर्थपणे पुढे जाऊ शकेल. तसेच आम्हालाही देशातील युवा पिढीला हे स्पष्टपणे सांगायचे आहे की भविष्यात स्वत:चा रोजगार हा शासनावर अवलंबून न राहता स्वत:च निर्माण करायचा आहे. या खंडप्राय देशात जर आम्ही एकत्र राहायचे असेल तर १५० ते १६० कोटी लोकसंख्येलाही जगवण्याची ताकद या देशाच्या मातीत आहे. लोकसंख्येचा भार हा शाप नसून ती ताकद निसर्गाने आम्हाला दिली आहे. त्या लोकसंख्येला आवश्यक असणाऱ्या शासकीय रोजगारासाठी भविष्यात फक्त निरक्षर आणि वंचित घटकांचा अपवाद करीत हा देश आरक्षणमुक्त झालाच पाहिजे किंवा झालेलाच असेल असा निर्धार व आमच्या मनाची तयारी आम्हाला करावी लागेल. २०१९मध्ये ज्या वर्गांना आम्ही अजूनही मागे ठेवले आहे किंवा जे मागे राहिले आहेत, त्या वर्गांना न्यायासाठी न्याय देत २०४७नंतर आरक्षण कायमचे बंद झालेले असेल हे सर्व भारतीयांच्या मनावर बिंबवण्यासाठी सदर विधेयक मांडत आहे.

पंतप्रधान मोरारजी देसाई वाला : सभापती महोदय, ज्ञानदेवांनी म्हणजेच ज्ञानेश्वरांनी काही शतकांपूर्वी महाराष्ट्रात ज्ञानेश्वरी लिहिली आणि 'हृदयी धरावो, स्वधर्मे सूर्ये पाहो' हा संदेश जगाला दिला. त्याच ज्ञानेश्वरांचे नाव धारण केलेल्या श्री. ज्ञानदेवांनी आज हे विधेयक मांडले आहे. २०४७ आरक्षणमुक्त भारत या विधेयकाचा विचार माझा पक्ष जरूर करेल. एकाच घराण्यापासून देश मुक्त करण्यासाठी आम्ही जो प्रयत्न करीत आलो त्याला अद्याप यश मिळालेले नसले तर आरक्षणमुक्त भारतासाठी आम्ही प्रयत्न करीत राहू. (पंतप्रधानांच्या भाषणात व्यत्यय आणत विरोधी बाकांवरून श्री. शिवराज विजय बारामतीकर बोलतात.)

बारामतीकर : *अहो पंतप्रधानसाहेब, २०४७च्या आरक्षणमुक्त भारताच्या या विधेयकाचे कौतुक करताना एकाच घराण्यापासून भारतमुक्तीची भाषा करताना मनुवादी, नथुराम गोडसेवादी व नागपूरी विचारांपासून गरिबांची सोडवणूक केलीत तरी पुष्कळ झाले...*

सभापती : श्री. शिवराज विजय बारामतीकर, पंतप्रधानांच्या भाषणात व्यत्यय आणू नका. कृपया बसून घ्या.

पंतप्रधान : सभापती महोदय, 'सबका साथ, सबका विकास' हा माझा मंत्रच आहे. आणि १६० कोटींचा भारत २०४७ साली आरक्षणमुक्त करायचा, हा विचार महत्त्वाचा आहे. पण आपला विचार मांडताना सभागृहात पटेलांच्या पुतळ्याच्या विषयावरून वातावरण बिघडवण्याचा जो प्रयत्न झाला त्याबद्दल मी सभागृहाला एवढेच सांगेन की इतिहासातील सत्य शोधून आम्ही एकसंध भारत निर्माण करणारा महापुरुष म्हणून आकाशाला गवसणी घालणारा पुतळा उभा केला आहे. आणि नागपूरी विचार हा देशाला बळकट करणारा आहे. त्यावर टीका करणे योग्य नाही. कारण राष्ट्रधर्म आम्हाला शिकवला गेला आहे.

रामदास मायावती : *माननीय सभापती महोदय, मनुवादी विचारांपासून दूर राहून आम्हाला बुद्धधर्माची दीक्षा देणारे डॉ. बाबासाहेब यांनी जर घटना लिहिली नसती तर आज हा देश सोविएत युनियनसारखा तुकडे पडलेला दिसला असता. तेव्हा डॉ. बाबासाहेबांचा पुतळा देखील मोठा का उभा करू नये.*

तानाजीराव बाजीराव : सभापती महोदय, हिंदवी स्वराज्याची स्थापना शिवप्रभूंनी केली. त्या शिवप्रभूंचा पुतळा रायगडावर सर्वांत उंच का असू नये?

सभापती : माननीय सदस्य, आपण सगळ्यांना उभे करू पण तुम्ही आता खाली बसा. आपण डॉ. बाबासाहेब आणि शिवाजींचा आदर करतो. ही चर्चा पण ते करत असताना सभागृहात पुतळ्यांवरून वाद घालण्यापूर्वी श्री. ज्ञानदेवांच्या विधेयकापूर्तीची चर्चा पुढे सुरू ठेवू.

पंतप्रधान : सभापती महोदय, श्री. ज्ञानदेवांनी स्पर्श केलेला मुद्दा खरोखरच ज्वलंत आहे. त्याला आम्ही सामोरे गेलो नाही तर

लोकशाहीला धक्का पोहोचेल म्हणून हे विधेयक अभ्यासासाठी संसदीय समितीकडे सादर करून पुढच्या अधिवेशनात आम्ही ठेवण्याचा प्रयत्न करू.

विरोधी पक्ष नेते अब्दुल गणी पठाण : *सभापती महोदय, १५० वर्षांपूर्वी कोणा एका पोरबंदरला करमचंद आणि पुतळाबाई यांच्या पोटी एक मोहनदास जन्माला आला आणि विद्वत्तेवर स्वार होत अन्यायाशी झुंज देत आफ्रिकेच्या अंगणापासून २०व्या शतकालाच नव्हे तर मानवजातीत अद्भुत ठरलेला तो सुपुत्र 'महात्मा' ठरला. त्याच्या स्मृतीला अभिवादन करीत मी म्हणेन की, अलीकडच्या काळात देशात वाढत चालेली विचारांची मुस्कटदाबी, झुंडशाही, वाढती गुंडगिरी, विविध हेतूने होत असलेल्या हत्या यासंदर्भात समाजप्रबोधन व सत्याचा आग्रह ही जागरूक समाजाची गरज आहे. तसेच लोकसंख्येवरून धार्मिक समज-गैरसमज वाढू लागले आहेत. त्याला वेळीच रोखण्याची गरज आहे. प्रचंड प्रमाणात शिक्षित तरुणांची बेरोजगारी, त्यातून निर्माण होत असलेली आंदोलने आणि आजची वास्तवाची परिस्थिती विचारात घेता शिक्षित युवा शक्तीला दिलासा देण्याची, नवी वाट दाखवण्याची गरज आहे. म्हणून या विधेयकाचे आम्ही स्वागत करीत आहोत.*

कमलताई कदम : सभापती महोदय, आम्ही ज्या पृथ्वीवर स्वार होऊन जीवनरूपी प्रवास करीत आहोत त्या पृथ्वीवर २०२०च्या दशकात [illegible]च्या लोकसंख्येचे ओझे आहे. या प्रचंड गर्दीने जल, ऊर्जा, वायु, ध्वनी व आकाशाला आव्हान दिले आहे. निसर्गाच्या [illegible]ला धक्का दिला आहे. हा धक्का, हे आव्हान व प्रचंड गर्दीने गुदमरू लागलेल्या भारतीय नवयुवकांचा [illegible] (प्रसंगी एक) हा आचार असेल. आम्ही कोणत्याही परिवारातले असू किंवा कोणत्याही धर्मातले असू, एक राष्ट्र-एक नीति या [illegible] कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या आड न येता भारतास हे धोरण स्वीकारावेच लागेल. माणूस म्हणून माझ्या-आमच्या राष्ट्राच्या, [illegible] कल्याणासाठी नैतिक कर्तव्य म्हणून २०२० नंतरचा विवाहबद्ध होणारा नवयुवक वसुंधरेच्या व स्वतःच्या सुखासाठी [illegible]त नियंत्रितपणा जपेल, तसेच केवळ दोन अपत्यांपर्यंतच कर्तव्य बजावणाऱ्यांना राष्ट्रीय धोरण म्हणून शासनाच्या [illegible] सेवा मिळू शकतील. अन्यथा नि:शुल्क शैक्षणिक सेवा, शिष्यवृत्त्या, आरोग्यविषयक शासकीय सोयी, अल्पदरातील अन्नधान्य, वृद्धावस्थेतील पेन्शन योजना, शासकीय व उपशासकीय रोजगाराच्या हमीपासून ते लोकप्रतिनिधी बनण्याच्या [illegible]तील. श्री. ज्ञानदेवांनी जे विधेयक मांडले आहे, त्याला पूरक ठरावेत म्हणून मी हे विचार व्यक्त केले आहेत.

गणपतराव [illegible] : *सभापती महोदय, मी ३० वर्षांपासून या सदनाचा सदस्य आहे. मी मौनी सदस्य आहे असेही लोक म्हणतात. पण आज मी [illegible]वावरील होत असलेला विनोद विसरून खरोखरच ज्ञानदेवांना शब्दरूपी अभिवादन करीत आहे. मला [illegible]वर दिंड्या पताका घेऊन जाताना 'ज्ञानोबा-तुकाराम, ज्ञानोबा-तुकाराम' असे अनेक वर्षे आम्ही म्हणत [illegible]ल बांधला... आम्हाला शिकवले की त्याने बेगम मुमताजसाठी सरकारी खजिन्यातून एक वास्तू उभी केली. [illegible] अनेक लोक वास्तुबरोबर पुतळेपण उभे करतात. पण त्या ताजमहालाने ३०० वर्षांनंतरही या देशातील किमान २०० [illegible]ना रोजगाराची, व्यवसायाची, पर्यटनाची संधी दिली आणि देशाच्या खजिन्याचे उत्पन्न वाढविले. त्या [illegible]कारण त्याने ३०० वर्षांनंतरच्या रोजगाराचा, पर्यटनाचा आणि सरकारी खजिन्याचा विचार केला. आ[illegible]र्ली व्ही.टी. स्टेशन निर्माण केले. त्या स्टेशनची सुंदरता आणि त्या स्टेशनमुळे १५० वर्षांनंतर रोज [illegible]ण्यासाठी मुंबापुरीत रेल्वेचे स्वप्न साकारले. आणि देशभर रेल्वेचे जाळे निर्माण केले. केवढा दूर[illegible]च विचार ३० वर्षांनंतरच्या भारताचा करणारा ज्ञानदेव माझ्या ३० वर्षांच्या संसदीय कारकिर्दीत मी [illegible]एकूण संपत्तीचा ८० टक्के वाटा मूठभरांच्या हातात आहे आणि २० टक्के उत्पन्नात ९८ टक्के जनता [illegible] आहे, [illegible] वर्षाने नव्या पिढीच्या रोजगाराचा दूरगामी विचार या विधेयकामुळे आम्ही करू शकतो. माझे सभागृहाला [illegible] सत्तेवर असू किंवा नसू पण उद्याच्या सक्षम भारतासाठी जातीपातीच्या लढाया, वर्गसंघर्ष, विषमतेची [illegible]र आतापासून लोकसंख्येला आवर घालत विकासाची संधी ज्यांना मिळाली नाही, त्या घटकांना शेवटची [illegible] आमची शासनयंत्रणा ही गुणवत्तेवर, कार्यक्षमतेवर उभी राहणारी ठरावी यासाठी या विधेयकाचे मी [illegible]*

सभापती : [illegible]धेयक अत्यंत महत्त्वाचे आहे. या विधेयकावर पूर्ण अभ्यास व्हावा व सभागृहाला योग्य वाटल्यास पुढील [illegible] अधिवेशनात [illegible]धेयक शासकीय स्वरूपात सादर करावे, असे मी सूचवतो. आणि सदर सभागृहाचे कामकाज पुढील [illegible]गित करीत असल्याची घोषणा करतो.